नियमित दिवाणी दावा क्र.१०/२०२३

**MHRG**130000922023

<u>नियमित दिवाणी दावा क्र. १०/२०२३ मधील नि.क्र.४७ खालील आदेश</u>

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. सदरचा दावा वादी यांनी दावा मिळकती संदर्भात डिक्लेरेशन व निरंतर ताकीदीची मागणीबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादीनी प्रस्तुत दाव्यामध्ये हजर राहून वादीचे कथन नाकारलेले आहे. प्रस्तुतचा दावा अंतरीम अर्जाचा युक्तीवादाकरिता प्रलंबित असताना, वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी नं.४ पुष्पलता गजानन मालुसरे या मयत झालेल्या आहेत. त्यांचे वारस यापुर्वीच दाव्यामध्ये पक्षकार केलेले आहेत. प्रतिवादी नं.४ या मयत झाल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादीला दाव्याच्या सरनामेत प्रतिवादी नं.४ च्या नांवाच्या पुढे "मयत" हा शब्द लिहून वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत असा मजकूर लिहीण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे. वादीचे कथन असे आहे की, सदरची फॉर्मल स्वरुपाची असून सदर दुरुस्ती मुळे नवीन केस निर्माण होणार नाही.

०३. प्रतिवादीनी त्याचे म्हणणे सदरच्या अर्जावर दिलेले आहे. प्रतिवादीने न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणणे तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. मागणी केलेली दुरुस्ती फॉर्मल स्वरुपाची आहे. प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती याचा विचार करता माझे मते मागणी केलेली दुरुस्ती मंजुर केल्यामुळे पक्षकारांमधील खराखुरा वादातीत प्रश्न अंतीमरित्या

निर्णीत करण्यास मदत होणार आहे. सबब वर नमुद कारणांकरीता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने परिच्छेद क्र.२ मध्ये उल्लेख केलेली दुरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी.

SAMEER KADER SHAIKH
Digitally signed by SAMEER KADER SHAIKH
Date: 2026.01.28 18:29:06 +0530

(एस.के.शेख)

दि.२८/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, श्रीवर्धन.